# "मराठी राज भाषा दिवस "

२७ फेब्रुवारी २०२४.
ज्ञानेश्वरांनी रुजली ती भाषा मराठी,
शिवरायांनी टिकविली ती संस्कृती मराठी,
संतांनी वाढविला तो वाण मराठी,
आमची मायबोली आमचा अभिमान मराठी.

मराठी अस्मितेचा मानबिंदू असणाऱ्या जागतिक मराठी भाषा दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा २७ फेब्रुवारी हा दिवस आपण मराठी साहित्याचा मानबिंदू असणाऱ्या वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करतो. मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी कवी कुसुमाग्रज यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्याचीच आठवण म्हणून त्यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून २७ फेब्रुवारी जागतिक मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. सर्व महाराष्ट्रीय लोकांच्या मनामनावर अधिराज्य गाजवणारी भाषा म्हणजे मराठी भाषा होय. अमृतालाही पैजेने जिंकेल अशी मराठी भाषा अशा मराठीत आमचा कोटी कोटी प्रणाम!

दिनांक २७फेबुवारी २०२४. मंगळवार ह्या दिवशी आॅपेस्टाॅलीक कारमेल हायस्कूल बांद्रे येथे मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला. ह्या निमित्ताने शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. काव्य वाचन, मराठी सुभाषिते व आदि कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

"मराठी सर्वांगसुंदर भाषा आहे." व तिच्या संवर्धनासाठी आपण सर्वांनी मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर केला पाहिजे.








